# उप निबधक, सहकारी संस्था,सिडको यांचे कार्यालय

शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र)मर्यादीत
बेलापुर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं.८, पाचवा मजला,सी.बी.डी.बेलापुर स्टेशन नवीमुंबई४००६१४ ई-मेल
dyregcidco@gmail.com

---

जा.क्र.उनि/संस्था इमारत./पुर्नविकास/ ९०९ /२०२६
दिनांक :- ०८/०१/२०२६

**प्रति,**
अध्यक्ष/सचिव
साईकृपा को.ऑप.हौसिंग सोसा.लि.
प्लॉट नं.११,सेक्टर-१०, सानपाडा,
नवीमुंबई,

**विषय:- <u>संस्था इमारत पुर्नविकासाबाबत.</u>**
**संदर्भ :-** १.संस्थेकडील दिनांक १७/११/२०२५ रोजीचा प्राप्त प्रस्ताव.
२. या कार्यालयाकडील प्राधिकृत अधिकारी नियुक्तीबरबतचे दिनांक १९/११/२०२५ रोजीचे पत्र.
३. प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयास दिनांक ०५/०१/२०२६ रोजी सादर केलेला विशेष सर्वसाधारण सभेचा अहवाल.
५. सहकार,पणन व वस्त्रोग विभाग,महाराष्ट्र शासन विभागाकडील शासन निर्णय क्र.सुगृयो२०१८ प्र.क्र.८५/१४-स,दिनांक ०४/७/२०१९ रोजीचा शासन निर्णय

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अवलोकन व्हावे.

२/- साईकृपा को.ऑप.हौसिंग सोसा.लि.प्लॉट नं.११,सेक्टर-१०, सानपाडा, नवीमुंबई, ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९(१) अन्वये नोंदणीकृत संस्था असून तीचा नोंदणी क्र.एन.बी.ओ.एम./सिडको/एचएसजी (ओ.एच.)/१५६८/जेटीआर/२००३-०४/दिनांक ०५/०९/२००३ असा आहे.

संस्थेकडील संदर्भ क्र.०१ रोजीच्या विषयांकीत प्रस्तावास अनुसरुन, संस्था इमारत पुर्नविकासाकरिता, विकासक निवड करणेबाबतच्या दिनांक ३०/११/२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित रहाणेकरिता या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ०२ अन्वये श्री.शरद वाघमारे,सहकार अधिकारी श्रेणी-१ अधिन सहनिबंधक,सहकारी संस्था,सिडको यांना प्राधिकृत करण्यांत आले होते.

प्राधिकृत अधिकारी श्री.शरद वाघमारे यांनी संस्थेकडील दिनांक ३०/११/२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहून सभेचा अहवाल दिनांक ०५/०१/२०२५ रोजी या कार्यालयास सादर केला आहे. सदर अहवालाचे व सहपत्रांचे अवलोकन केले असता, संस्था इमारतीच्या इमारत पुर्नविकासाकरिता संस्थेच्या दिनांक १५/०१/२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत ठराव क्र.०२ अन्वये मे.ट्रायआर्च डिझाईन स्टुडीओ,बेलापुर या संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यांत आलेली आहे. साईकृपा को.ऑप.हौसिंग सोसा.लि.प्लॉट नं.११,सेक्टर-१०, सानपाडा, नवीमुंबई, संस्था इमारतीच्या पुर्नविकासाच्या अनुषंगाने विकासक निवडीबाबतची सभा सौराष्ट्र पटेल समाज हॉल,भुखंड क्र.०६,सेक्टर-०२,सानपाडा स्टेशन जवळ, सानपाडा,नवीमुंबई येथे दिनांक ३०/११/२०२५ रोजी दुपारी ०१.००वा. आयोजित करण्यांत आली होती. संस्था इमारतीमधील सदनिकांची संख्या ९६ आहे. संस्थेतील ९६ सदनिकाकरिता ९३ सभासद आहेत. पैकी ०३ सभासद मयत आहेत. संस्थेच्या ९०

सभासदांपैकी संस्थेच्या विषयांकीत विशेष सर्वसाधारण सभेस संस्थेचे ७६ सभासद उपस्थित राहिले आहेत. सभेस उपस्थित सभासदांची टक्केवारी ८४% इतकी आहे. त्यामुळे शासन निर्णय दिनांक ०४/७/२०१९ मधील १७ (क) प्रमाणे विशेष सर्वसाधारण सभेचा कोरम पूर्ण झाला आहे.

संस्था इमारतीच्या पुनर्विकासाचे अनुषंगाने दिनांक ३०/११/२०२५ रोजी आयोजित केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत उपस्थित ७६ सभासदांपैकी ५५ सभासदांनी संस्था इमारतीचा पुनर्विकास करणेसाठी विकासक म्हणून **मे.गामी सन्स ॲण्ड दिया एलएलपी,वाशी** यांची निवड केलेली आहे व तसा नियुक्तीचा ठराव उपस्थित असलेल्या सभासदांनी बहुमताने केलेला आहे.

सबब, संस्थेने या कार्यालयात दाखल केलेला पुनर्विकासाचा प्रस्ताव,संस्थेच्या दिनांक ३०/११/२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयात दाखल केलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता संस्थेने इमारतीच्या पुनर्विकासासाठी **मे.गामी सन्स ॲण्ड दिया एलएलपी,वाशी** यांची विकासक म्हणून नियुक्ती केल्याचे निदर्शनास येते व सदर कागदपत्रांची नोंद या कार्यालय स्तरावर घेण्यांत येत आहे.

**(प्रताप पाटील)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था,सिडको,नवीमुंबई**

उपनिबंधक सहकारी संस्था सिडको नवी मुंबई सत्यमेव जयते

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**
मा.अतिरिक्त नगररचना अधिकारी,बांधकाम विभाग,नवीमुंबई महानगरपालिका,नवीमुंबई.

**उपनिबंधक**
**सहकारी संस्था,सिडको,नवीमुंबई**